# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


## <u>प्रेसनोट</u>

दिनांक २२/०६/२०२३

**“ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखा ”**

**“ स्वतःचे आर्थिक फायदयासाठी वेश्याव्यवसाय करवुन घेणा-यांवरती कारवाई करुन ०२ पिडीत महिलांची सुटका केलेबाबत ”**

पिंपरी चिंचवड येथील स्पाचे नावाखाली स्वतःचे आर्थिक फायदयासाठी अवैध रित्या मुलींना स्पाचे नावाखाली जास्त पैशाचे अमिष दाखवून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडतात. अशी गोपनीय माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्राप्त झाली.

त्यानंतर अशा व्यक्तींची गोपनीय माहिती काढून, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, गुन्हे शाखे कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २१/०६/२०२३ रोजी हिंजवडी परिसरातील **Luminous SPA** शॉप नं २०६, दुसरा मजला, सुरतवाला मार्क प्लाझा, हिंजवडी वाकड रोड, पुणे या ठिकाणी सापळा रचुन सदर ठिकाणी बनावट ग्राहकासह अचानकपणे छापा टाकुन, आरोपी १) **राहुल नवनाथ कांगणे**,वय-२८ वर्षे,रा.सुनिल कसाळे यांची रुम,सुतार वस्ती,माण ता.मुळशी जि.पुणे मुळ पत्ता-मु.कुणकी ता.जळकोट जि.लातुर याचे ताब्यातून **दोन पिडीत मुलींची** वेश्याव्यवसायातुन सुटका करुन आरोपी विरुध्द हिंजवडी पोलीस स्टेशन येथे **गुरनं - ७४१/२०२३ भा दं वि क ३७०(३) सह अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास हिंजवडी पोलीस स्टेशन करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा. पोलीस सह आयुक्त, डॉ. संजय शिंदे सो, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी सो, मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) स्वप्ना गोरे मॅडम, मा.सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) सतीश माने सो यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षातील पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण, पोउपनि प्रदिपसिंग सिसोदे, धैर्यशिल सोळंके, विजय कांबळे पोलीस अमंलदार, भगवंता मुठे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, संगीता जाधव, रेश्मा झावरे, सोनाली माने यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड